दै. गोदातीर दि 21.03.2025

# पोलीस आणि जनतेमध्ये सुसंवाद आवश्यक -शहाजी उमाप

## विमानतळ ठाण्याअंतर्गत पोलीस चौकीचे उद्घाटन




**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये तसेच पोलीस संरक्षणापासून उपेक्षित असलेल्या या भागाला खऱ्या अर्थाने पोलीस चौकी देण्यात आली. या माध्यमातून या भागात होणाऱ्या गुन्हेगारीवर प्रतिबंध येण्यास मदत होईल. पोलीस आणि जनता यांच्यात सुसंवाद असला तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, असे मत नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी व्यक्त केले.

शहरातील सांगवी बु. भागात असलेल्या कामगार पुतळा परिसरात विमानतळ ठाण्यांतर्गत नुतन पोलीस चौकीचे शहाजी उमाप यांच्या हस्ते गुरुवार, दि. २० मार्च रोजी उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटन सोहळ्यास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलीस निरीक्षक गणेश चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक जोंधळे, शासकीय कंत्राटदार सुमित मोरगे, भाजपचे दत्ता पाटील कोकाटे, नगरसेवक प्रतिनिधी श्याम पाटील कोकाटे, सदाशिव पुरी, किशनराव कोकाटे, राजू पाटील कोकाटे, संदीपसिंघ गाडीवाले, माधव पाटील, चक्रधर कोकाटे, प्रकाश कदम, रमेश कोकाटे या भागातील पत्रकार प्रल्हाद कांबळे, राम तरटे, अर्जुन राठोड, किरण कांबळे, आनंदा शिंदे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना शहाजी उमाप म्हणाले की, या भागात मॉर्निंग वॉक आणि फेरफटका मारणाऱ्या नागरिकांना, महिलांना रोड रॉबरीसारख्या घटनांना सामोरे जावे लागत होते. पोलिसांच्या दृष्टीने हा उपेक्षित भाग होता, परंतु आता या नवीन पोलीस चौकीच्या माध्यमातून या भागातील नागरिकांना नक्कीच सुरक्षा मिळणार असून गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे. पोलीस आणि जनतेमध्ये जर सुसंवाद असेल तर कुठल्याही प्रश्नांना सामोरे जाता येते. कायदा व सुव्यवस्था बाधित होत नाही. या पोलीस चौकीतून नक्कीच या परिसराचे संरक्षण करण्यासाठी कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी प्रयत्न करतील, असा विश्वास शहाजी उमाप यांनी व्यक्त केला.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार हे बोलताना म्हणाले की, या परिसरात मोठ्या प्रमाणात आता नागरिकांची गर्दी होत आहे. हा परिसर विस्तारित होत असल्याने व्हीआयपी मुव्हमेंट या भागात मोठ्या प्रमाणात असते. कारण विमानतळ आहे. जनता आणि पोलीस यात समन्वय असेल तर नक्कीच चांगला समाज घडू शकतो. नागरिकांनी पोलीस दलासोबत ज्या काही आपल्या समस्या असतील त्यांनी थेट मांडाव्यात नक्कीच पोलीस त्यांच्या स्तरावर पीडितांना न्याय देतील असेही अबिनाश कुमार यांनी सांगितले. यावेळी दत्ता पाटील कोकाटे आणि श्याम पाटील कोकाटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष देवराये यांनी केले. यावेळी आयजी आणि एसपी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिक, नगरसेवक प्रतिनिधी, माजी नगरसेवक, सांगवी येथील प्रतिष्ठित नागरिक आणि पत्रकार उपस्थित होते.